Vol 4 Issue 7 April 2015

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research ISSN : 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF)
Volume-4 | Issue-7 | April-2015 Available online at www.ror.isrj.org

# संत ज्ञानेश्वर

*महाजन एस. आर*
कला शाखा– मराठी विभाग द. ग. तटकरे महाविद्यालय माणगांव – रायगड

Co-Author Details :

*सिद्धेश दिलिप चिले* (S.Y.B.A) [1] , *मोहिनी राजु उभारे* (S.Y.B.A.) [2]
कला शाखा– मराठी विभाग द. ग. तटकरे महाविद्यालय माणगांव – रायगड




## प्रस्तावना :

संत ज्ञानेश्वर यांच्या मधूराभक्तीवर काव्याचा तौलनिक अभ्यास हया माझ्या ग्रंथात दोन्ही संतकवींच्या कृष्ण प्रेमावर कवितेचा अनेक अंगी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत्वाने तौलनिक अभ्यास पध्दतीचा आश्रय करून या दोन कवींच्या मधूरभक्तीसंबंधीही अभ्यासान्ती काही साम्यविरोध स्थळे शोधण्याचा प्रस्तूत ग्रंथात प्रयत्न केला आहे.

हया दोन कवींपैकी ज्ञानेश्वर हे तेराव्या शतकातील मराठीतील सर्वश्रेष्ठ संतकवी आहेत, तर मीराबाई हया पंधराव्या शतकातील राजस्थान परिसरातील एक श्रेष्ठ संत कवयित्री आहेत. या दोन्ही संतकवींचे प्रादेशिक तसेच कालसंदर्भही वेगळे आहेत. हयापैकी उत्तर काळातील मीराबाई हया ज्ञानेश्वरप्रणीत मराठी संत काव्यपरंपरेच्या संपर्कात आल्या, असे दर्शवता येण्याची शक्यता नाही. शिवाय ज्ञानेश्वर व मीराबाई हे दोघेही व्यापक अर्थाने भारतीय मधूर काव्य परंपरा सिध्द होण्यात व ती विकास पावएयाम सिंहाचा वाटा उचलताना दिसतात.

कृष्णभक्तीने सर्वोच्च शिखर गाठून तेथील दुर्मिळ,अद्‌भूतए अलौकिक व गूढ अनुभव दोघांनीही व्यक्त केले आहेत. प्रेमभक्तीतील अद्‌भूत अपनुभवविश्वाचा काव्यात्म अविष्कार ही त्यांच्या कविमनांच्या अविष्काराची शैली आहे.

त्यामुळेच यादवकालीन संत ज्ञानेश्वर मोगकालीन यांच्या काव्यात काही साम्यस्थळे निर्माण झाली असावीत असे वाटते. त्यांचाच आधार घेउन हया संतद्वयाचा मधुराभक्तीवर काव्याचा अभ्यास करण्यासाठी तौलनिक अभ्यासपध्दतीचा अवलंब केला आहे. तौलनिक अभ्यासपध्दतीसाठी आवश्यक असणारी भिन्न भाषिकता हया दोन संतकवींच्या काव्यनिर्मितीत संभवते.

दोघांच्याही कविता एकाच भारतीय संस्कृतीतून उगम पावल्याने त्यात साम्यही संभवते. तेव्हा तौलनिक साहित्याभास पध्दतीचा अवलंब करून हया दोन कवींच्या काव्यांतील साम्यविरोधाचा शोध घेणे औचित्यपूर्ण ठरते.

काव्यातील अध्यात्मिक आशयाच्या दृष्टीने ज्ञानेश्वर हे अद्वैताकडून मधूराभक्तीकडे वळले आहेत. तर मीराबाई हया द्वैताधिष्टीत भक्तीसाधनेकडून अद्वैताच्या भूमिकेकडे पोहोचताना दिसतात. अशा प्रकारे द्वैतअद्वैताचा प्रश्न दोघंच्याही मधूराभक्तीत मिटून गेलेला दिसतो.

असे असले तरी प्रदेश सापेक्षतेनेए भाषा सापेक्षतेने तसेच काल सापेक्षतेने या दोघांच्याही कवितेत अंतर पडणे अपरिहार्य आहे. शिवाय ज्ञानेश्वर मधुराभक्तीत गौळणी विरहिणीपर कविता रचित असले, तरी अखेर हे मन एका ज्ञानसिध्द योग्याचे आहे. तर मीराबाई हे मन प्रेमभ्क्ती ओथंबिलेले व अंतर्बाह्य श्रीकृष्ण ध्यासाने परिपूर्ण भरले असे एक स्त्रीमन आहे. हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. या दोन संतकवींच्या मधुराभक्तीकाव्यातील अंतर याच दिशेने शोधता येते.

*उद्‌देश*

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती जाणून घेणे.
संत ज्ञानेश्वरांनी रचलेल्या अभंगाची सकविस्तर माहिती जाणून घेणे.
ज्ञानेश्वरांच्या विविध वाड.मयाची ओळख करून देणे.
ज्ञानेश्वरांनी रचलेल्या अभंगांची माहिती प्राप्त करून घेणे.

***संत ज्ञानेश्वरांचे बालपणः–***

संत ज्ञानेश्वर यांचा जन्म संन्यस्त वृत्तीच्या कुटुंबात झाला.बालपणीच त्यांना अनेकविध संकटांना तोंड द्यावे लागले. आई–वडिलांचा प्रायश्चितरुप मृत्यु, समाजाकडून वाट्याला आलेले बहिष्कृत जीवन यामुळे बालवयातच त्यांचे कोवळे मन पोळून निघाले.अनेक हाल अपेष्टा सहन करून त्यांनी जीवनाची संत म्हणून समर्थपणे वाटचाल केली.

संत ज्ञानेश्वर हे बालपणापासून विरक्त होते. त्यांचे बालरूपही आपल्या समोर येते ते अलौलिक व असाधारण बालयोगी म्हणून ज्ञानेश्वरांच्या असामान्य व्यक्तीमत्वात सामान्य रूप शोधणे कठीणच आहे. परिपक्व व समंजस असे म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या काव्यातूनही प्रारंभापसून दिसते.

ज्ञानेश्वर हे श्रेष्ठ योगसिध्द व अभिजीत संतक वी होते. मानवी मनाचे सर्व सात्विक व सुमोकल धर्म त्यांच्या व्यक्तिमत्वास व कवितेस समृध्द करतात. त्यांची कविता समृध्द संवेदना व कोवळीकतेने वेगळी वाटते. त्यामुळेच त्यांचचं मानवीपण त्यांच्या व्यक्तिमत्वाचे व कवितेचे लेणे ठरले आहे. मुक्ताबाईंच्या त्या ताटीच्या अभंगाने एकदाच अनपेक्षितपणे ते प्रकटून गेले.

***जीवनसंघर्षः–***

संत ज्ञानेश्वर यांना प्रारंभीच्या आयुष्यात कटू अनुभवांना सामोरे जावे लागले, परंतु आश्चर्य हे की एकदाही त्यांच्या समाजाविषयीचा विरोध,विद्रोह, सात्विक संताप, चीड किंवा उद्वेगाची भावना दिसून येत नाही. त्यांनी सतत विनम्र भावनाच धारण केली आहे. आपल्या पसायदानातून त्यांनी स्वतःसाठी काहीही न मागता

‘जे खळांची व्यंकटी सांडो ।तया सत्कर्मी रती वाढो । भूता परस्परे पडो ।मैत्र जीवांचे ।।
दूरितांचे तिमिर जावो ।विश्व स्वधर्म सूर्य पाहो ।जो जे वांछिल तो ते लाहो प्राणी जात ।।’

अशा प्रकारे उदात्त विचार प्रगट केले आहेत. ज्या समाजाने त्यांच्या आई–वडिलांना देहान्त प्रायश्चित्त दिले, त्याचे ज्ञानेश्वरांनी कल्याणच चिंतिले ज्या समाजाने त्यांच्यावर सन्यास लादला त्यांना बहिष्कृत ठरवले त्यांच्याविषयी त्यांनी पवित्र व उदात्त वाणीतून कधीही तिरस्काराचे शब्द बाहेर काढले नाहित. समाजाविषयीची कटुता यत्किंचितही व्यक्त न करणे हे ज्ञानेश्वरांचे वेगळेपण होय. ज्ञानेश्वरांनी संघर्षाचे जीवनसंवादात रूपांतर करून समकालीन समाजाशी आपल नाते जोडले. याचे कारण ज्ञानेश्वरांचे अवघ्या विश्वावर असलेले प्रेम, परमेश्वरत्त्व भूतमात्राातच नव्हे तर चराचरात भरून राहिले आहे. या नाजूक संवेदनशीलतेने ते जीवन जगतात. त्या मुळेच ज्ञानेश्वर बाह्य जावनाशी संघर्ष करू इच्छित नाहीत. कारण त्यांची मूळ प्रवृत्ती ही संघर्षाची नाही. संघर्ष त्यांच्यावर लादला गेला आहे तो तत्कालीन समाजव्यवस्थेने. ज्ञानेश्वरांच्या विश्वव्यापक मनाला मूलतः हा संघर्ष न रूचणारा आहे. ते संघर्षावर मात करतात आणि विश्वात्म मनाने आदर्श परतळीवर व्यक्तिगत व सामाजिक जीवनही व्यतित करू पहातात.

***अभिजात वैराग्यः–***

ज्ञानेश्वरांचीच नव्हे तर या सर्व भावंडाचीही वैराग्यशीलता काहीशी अभिजात स्वरूपाची आहे. त्यामुळेच तिच्या स्वरूपात विविधता जाणवते. निवृत्तीनाथ हे तर वैराग्याचे मूर्तिमंत प्रतिक आहेत. ज्ञानेश्वरांची वैराग्यशीलता त्यांच्या सुकोमल संवेदनशीलतेमुळे व प्रतिभा ज्ञानामुळे चैतन्यपूर्ण, निर्माणक्षम व मृदुमळ वाटते.

मात्र ज्ञानेश्वरांची वैराग्यशील वृत्ती स्वतःचा लौकिक प्रपंच नाकारून ब्रम्हरूपाने प्रकटणा–या जगतास प्रेमभराने व भूतदयावादी भूमिकेतून कवेत घेणारी आहे. त्यामुळे त्यांची बिरागी वुत्तीत लौकीकास नकार असला तरी विश्वव्यापक होकार असल्याने ती एकसुरी वाटत नाही. ती लौचिक सौंदर्यलक्षी प्रेमाने संपृक्त अशी अद्‌भूतरूप वाटते. त्यांनी एकविसाव्या वर्षी समाधी घेतली. ह्यात त्यांचे बावनकशी वैराग्य प्रकट झाले. पण तत्पूर्वी त्यांनी संपूर्ण विश्वाचे मंगल व्हावे असे ग्रंथ निर्माण करून ठेवले. यावरून ज्ञानेश्वर हे महामानव वाटतात. त्यांचे वैराग्य हे असे विश्वकल्याणात र्प्यवसित होते. निवृत्तीनाथांसारखा वैराग्याचा

महामेरूही ज्ञानेश्वर समाधी प्रसंगी विरघळतो तो त्यामुळेच.

*व्यक्तीमत्वाचा विकासः–*

येथे ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा विचार केला तर असे लक्षात येते की, अशाच प्रकारे ज्ञानेश्वरादी भावंडाना व त्यांच्या आई वडिलांना समाजाने बहिष्कृत केले. परिणामी त्यांनाही सामाजिक संघर्ष करावा लागला, परंतु कोठेही वैयक्तिक जीवनातील दुःखाची चित्रणे ज्ञानेश्वराच्या अभंगातून येते नाहीत.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की, ज्ञानेश्वर सुरूवातीपासूनच त्यांच्या ग्रंथसंपइेतून दिसतात ते श्रेष्ठ योगी, संत व असामान्याकडे होताना दिसत नाही. ते प्रारंभीच दिसतात ते असामान्य रूपात. जीवनातील संघर्ष पचवूनही ज्ञानेश्वर शांत, संयमी व आनंदीच रूपात जीवनातील संघर्ष पचवूनही ज्ञानेश्वर शांत,संयमी व आंनंदीच राहिले आहेत. समाजाच्या अवहेलनेचा, रोषाचा यत्किंचितही परिणाम त्यांच्या संयमित मर्मावर होउ शकला नाही. किंवा झााला तरी त्याचे पडसाद साहित्यातून उमटले नाहीत. त्यातुनच त्यांच्यातील संतत्व अंकुरत गेले. महाकाल समुद्रातूननियचलपणे उभ्या असणा-या एखाद्या खडकाप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व भासते.अनेक विशाल लाटा येउन आदळल्या तरी खडक मात्र निश्चलच राहावा, तसे संत ज्ञानेश्वर वाटतात.

*संत ज्ञानेश्वरांची भक्तिशैलीः–*

संत ज्ञानेश्वर हे निर्गुण निराकार परमेश्वररूप मानणारे असले, सगुनभक्ती करण्यासाटी आनंदही त्यांनी गौळणी विरहीणीपर रचनांनी प्राप्त केला. जशी त्यांनी निर्गुण परमेश्वराची उपासना केली तशीच सगुण भक्तिही उत्कटपणे केली एवढेच नव्हे तर श्रीकृष्णास प्रियकर वा पती मानून स्वतःकडे गौळणीची मानाची भूमिका घेउन मधुराभक्तिही अनुभवली,ज्ञानेयवरांनी मीराबाईप्रमाणे श्रीकृष्णाचे एक रूप कल्पून भक्ति केली नाही, तर त्या भक्तिरूपात विविधता आणली
.

*ज्ञानदेवांचे वाङ्‌मय*

*1.उत्तरगीताः–*

महाभारतातील अश्वमेधपर्वातील उत्तरगीतेवरील ज्ञानदेवकृत प्राकृत व्याख्या आहे. एकूण अध्याय इ. मुळ संस्कृत श्लोक १४५, मराठी ओव्या ५६८, प्रतिपाद्य विषय योगसाधन, आत्मदर्शन आणि त्यासाठी गुरूकृपेचे अपरिहार्यपण योगारूढ आत्मज्ञानपरायणाची महती वर्णन करताना येथे तप तीर्थयात्रा,वेदशास्त्र, अभ्यास, मुर्तिपूजा या मसर्गाचा स्पष्ट निषेध केलेला आहे. वेदशास्त्राच्या अभ्यासाने प्रतिष्ठा मिळेल पण आत्मज्ञानाला लाभ होत नाही हे येथे स्वच्छ सांगितले आहे.

*2.योगवासिष्ठः–*

ज्ञानदेवांनी योगवासिष्टातील भवार्थ थोडक्यात सांगणारी टिका लिहिली याबद्दलची नामदेवांनी दिलेली साक्ष निस्ससिग्ध आहे.

‘वसिष्ठ गीतेची टीका । ग्रंथ संचिला नेटका
भावार्थ काढिला श्लोक । ग्रंथरना दाखिली ।।’’

श्री. गो. का. चांदोरकारांनी प्रसिद्ध केलेले ज्ञानदेवांचे ‘योगवासिष्ठ’ आणि नामदेवो लेखत ही एकच प्रदर्शित केलेली आहे.

*3.वसिष्ठेबोध :–*

ज्ञानदेव कृत आनखी एक वरिष्ठबोधाचा परिचय वि. का. राजवाडे यांनी करून दिलेली आहे. यात एकुन सुमारे १५० ओव्या आहेत. सहाव्या प्रकारणाच्या शेवटी पुढिल ओवी आलेली आहे. ‘‘ऐसे हे परमार्थ साधना परउपकारार्थ बोलणे । वसिष्ठरामा संवादे कथना ।म्हणे ज्ञानदेवा ।

*4.प्राकृतगीत :–*

या ज्ञानदेवकृत प्राकृतगीतेचा परिचय वि. का. राजवाडे यांनी इ. स. मं. च्या शके १८३६ च्या वर्षिक इतिवृत्तात करून दिलेला आहे. या परिचयात हे सांगण्यात आले आहे की, ‘‘ह्या संबंध ग्रंथात फारसी किंवा कानडी वाटनार एकही शब्द नाही. व्यासाच्या भगवद्गीतेचे प्राकृतसार अंज्ञांकरिता येथे देतो असे ज्ञानेश्वर सांगतात.

*5.आणखी एक प्राकृत गीता :*

ज्ञानदेवरचित आणखी एक प्राकृतगीत पस्तुत लेखकाने भा. इ. सं. मंडळात पाहिलेली आहे. राजवाड्याना मिळालेल्या प्राकृत

गीतेच्या २६ ओव्या आहे. या प्राकृत गीतेतील संपूर्ण नववा अध्याय पुढे दिल्याप्रमाणे आहे.

''पार्था म्या जग व्यापिले । मजविन नाही ते वहिले ।
मी नाही ते वाईले निवडुनी सांगे ।।१।।

*6.स्वात्मानुभव :*

या ग्रंथाच्या कालनिर्देशाची या ग्रंथातील पुढिल ओवी महाराष्ट्रात सारस्वत करांनी अद्भुत केलेली आहे. ती अशी ''शके बाराशे बारा । तै ग्रंथ केला उभारा । परिसावया चतुरा । म्हणे निवृत्तीदास ।।''

*7 भक्तिराज किंवा भक्तराज :*

हा सुमारे ३०० ओव्यांचा ग्रंथ यातील तत्त्वज्ञान ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाशी जुळनारे काही ओळीतर उघड उघड अमृतानुभवाची आठवन करूण देणाऱ्या आहेत

''दो नेत्री येक देखने । दो करी येक करणे ।
दो कानी ऐकणे एक नादु ।।''

*8.शुकाष्टकटीका :–*

हा ग्रंथ इ. स. १६०३ मध्ये ना. चि. केळकरांनी काव्यसंग्रहात संपादत केला होता. त्यात आरंभीचे नमन नाही एकूण ओवीसंख्या ४६ आहे. ख.चि. मेहेंदळे यांनी दारव्याचे वकील श्री. डाऊ यांच्या कडून या ग्रंथाची जी. एक प्रत मिळाली तिच्यात एकुन ७१ ओव्या आहेत शके १२१६ या वर्षी जय सवंत्सर आहे नलकारा परा ही अक्षरे चुकून जास्त लिहीण्याचा संभव आहे.

*9.पंचीकरण :*

योगाचे साधन म्हणून पहिल्या प्रकाणात पंची करणाची माहिती दिलेली आहे. भाषा मांडली आधि वर्णनशैली या बाबतीत हा ग्रंथ ज्ञानदेवांच्या इतर ग्रंताशी न जुळनारा असा आहे.

संत ज्ञानेश्वरांनी रचलेले अभंगः-

''अधरं मधुर, वंदन मधुरं, नयन मधुर हसित मधुरम् ।
ह्यदय मधुरं, गन मधुर, नृत्यंमधुर, संख्यं, मधुरम ।
वेणुर्मधुर, रेणुर्मधुर, पाणिर्मधुर, पादौधुरौ ।
रूप मधुरं, तिलकं मधुर, सलिल मधुरम्, कंमल मधुरम् ।।
रचन मधुर, वसनं मधुर, चलित मधुर, वलित मधुरम् ।
चरित मधुरं, भ्रमित मधुरं, मधुराधिपते अखिल मधुरम् ।।''

ब्रजगोपींनी ज्यांची अशी अनन्यसाधारण भक्ती केली तो श्रीकृष्ण हा कोणत्याही दृष्टीकोणातुन अद्भुत व अलौकिक होता. श्रीकृष्णानंतर कोणताही पुरूष जन्मला नाही. हे मीराबाईचे मतत र सर्वश्रुतच आहे. श्रीकृष्णासारखे मोहक रूप त्यांच्यानंतर कोणत्याही पुरूषाला लाभले नाही. श्री बल्लभाऱ्यांयांनी आपल्या मधाळ शब्दांत त्यांचे अत्यंत मोहक वर्णन केले आहे.

अशा रितीने ब्रजलोपींना श्रीकृष्णाची प्रत्येक गोष्ट मधुर वाटे, प्रिय व्यक्तिची प्रत्येक गोष्टच प्रिय व्हावी त्याचप्राणे श्रीकृष्णाचे पाहणे, बोलणे, चालणे, सर्वच अमृतमय असल्याचा साक्षात्कार ब्रजांगनांना झाला आणि तो केवळ ब्रजगोपींनाच झाला असे नव्हे, तर ब्रज प्रदेशातील अवघ्या स्त्रीपुरूषांनाही होत राहीला. गोपींना श्रीकृष्ण स्वरूपाचे माधुर्य स्त्रीमनामूळे उत्कटपणे अनुभवता आले तितक्याच उत्कटपणे ते गोकुळातील गोपांना घेता येणे शक्य नसल्यानेच गोपांपक्षा गोपींच्या भक्ती अधिक सहज व माधुयपूर्ण आहे असे आपण मानतो स्त्री आणि पुरूष यांच्यातील प्रेममाधुर्याची तुलना अन्य कोणत्याही नात्याशी करता येणे शक्य नसते. संख्यत्व, वात्सल्य, दास्य यामागील भावना उत्कट असल्य तरी त्या स्त्री पुरूष प्रममाधुर्याहुन ऐक्य भावनेत कमीच पडतात.

''तव्दन्धूनांच कल्याण : प्रजांना चानुपोषणम् ।। २४।।
दु. शीलो दुर्भलो वृध्दो जडोरोग्यधनोडपिवा ।।
पति : स्त्रीभिर्न हातव्यो लोकेप्सुभिर पातकी ।। २५ ।।
अस्वल्यमयशस्यंच फलगु कृच्छ्रं भयावहम् ।
जलुप्सितंच सर्वत्र औपपत्य कुलस्त्रिया : ।। २६ ।।
श्रवणवाद् दर्शनाद ध्यानान्मयिभावोडनुकीर्जनात् ।
न तथा सन्निकर्षेण प्रतिया ततोगृहान ।। २७।।

श्रीकृष्ण त्यांना म्हणाला, तुम्ही विवाहीत आहात. कुलवधूंना शोभणार नाही असे वागू नका. पती, सासू, सासरे व आई – बाप यांना प्रिय होईल असेच वर्णन ठेव.

याच भूमिकेतून श्रीकृष्णाने गोपींसह रासक्रिडा केली व ती करीत असता क्षणार्धात प्रकट होऊन व क्षणार्धात लुप्त होऊन गोपगणिक विविध रूपे धारण करून श्रीकृष्णाने त्या सर्वाना एकीकडे प्रेम क्रिडेचा आनंद दिला व त्याचवेळी त्यांचे स्वतःसंबंधी

इश्वरविषयक भान सजल ठेवले. त्यामुळे या रासक्रिडेला कामक्रिडेचे लौकीक रूप  न येता ती अलौकीक अशी भक्तिरासक्रीडा ठरली स्त्री. पुरूष नात्यातील कामभाव व स्वार्थभाव गळून गेल्यानंतर जी उरते तीच मधुराभक्ती होय. स्वता श्रीकृष्णाने गोपिकांना स्पष्टपणे बजावले होते.

न मयि आवेशितधिया कामःकामाय कल्पते ।
भर्जिता कथिता धाना प्रायोबीजाय नेष्यते ।।

ज्याप्रमाणे भाजलेले धान्य पेरणी करण्यास निरूपयोगी ठरते, त्याचप्रमाणे मला चित्त अर्पण केल्यानंतर कामवासनांना स्थानच नाही. त्या जळून जातील हे धान्यात असू ध्या. अनन्य भक्तिची सर्व लक्षणे गोपींच्या आचनणात प्रकट होती. तनूमनोन त्या त्याच्याशी एकरूप झाल्या होत्या. त्यांच्या विरहाने परमव्याकूळ होत होत्या. आपले अवेध जीवन त्यांनी त्यास समर्पण केले होत. उत्कट व निरंतर कृष्णाचिंतनाने त्या स्वतःच कृष्णमय झाल्या होत्या व श्रीकृष्ण सुखी तर आपण सुखी आणि त्याच्यावर संकट तर आपल्यावरही संकट अशा एकात्मतेने त्या जगत होत्या. म्हणुनच प्रमभक्तिचा परमोच्च कळस म्हणजे गोपींच्या मधुराभक्ती होय. आपल्या य अद्‌भुत प्रेमभक्तीने गोपी दूर्लर्भ अशा महाभाव अवस्थेत निरंतर राहील्या. म्हणजूनच हजारो वर्षे लोटली तरी गोपींची कृष्णाविषयक मधुरभक्ती कुणालाही आत्मसाद करता आली नाही. हीच परमभक्ती होय. तीच एकान्तिका म्हणून ओळखली आहे. ती स्वतःच फलस्वरूप असते असे नारदांनी स्पष्ट केले आहे. नारद हे स्वतःच श्रेष्ठ विष्णुभक्त असल्याने त्यांचे भक्तिविषयक विवरण आत्मानुभव व आत्मासात्कारावर अधिष्ठित झालेले आहे. भालवतकरांनी या भक्तीची जी नऊ रूपे सांगितली त्यात नारदांनी अधिक भर घालून तिची अकार लक्षणे सांगितलेली दिसतात. भगवतात ही नवविधाभक्ती सातव्या स्कंधातील पाचव्या आध्यायात तेवीसाव्या श्लोकात श्रीप्रल्हाद मुखाने सांगितली गेली आहे.

### *संदर्भग्रंथ*


१ डॉ. अच्चुत नारायन देशपांडे  प्राचीन मराठी वाङःयाचा इतिहास नागपूर विद्यापिठ, ववक्क्षव वववक्क्षव नागपूर

वमंचरकर रत्नाकर बापूराव धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङःमय प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथम  आवृत्ती डिसें. २०००

व नसिराबादकर ले. रा प्राचीन मराठी वाङःयाचा इतिहास फडके प्रकाशन कोल्हापुर, ७ वी आवृत्ती. ऑक्टो. २००३

व आगरकर सुहास महाराष्ट्रातील पंथ .डायमंड पब्लीकेशन पुणे,प्रथम आवृत्ती  नोव्हें २००६

व  भावे विनायक लक्ष्मण  महाराष्ट्र सारस्वत खंड – १ पॉप्युलर प्रकाशन  ६ व  मुंबई,ववववध्ववववव

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org